जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांच्या सन २०२४ – २०२५ वर्षाकरीता भंडारा जिल्हयातील वाडेगाव (रिठी), मांडवी, कोथुर्णा, जुनी टाकळी, ता. भंडारा, पवनी तालुक्यातील भोजापूर, भोजापूर-२, खातखेडा, विलम, जुनोना-२, येनोळा-२, मांगली-१, तुमसर तालुक्यातील चारगाव, सुकळी दे, लोभी, मांडवी, वारपिंडकेपार,सोंड्या, चांदमारा, आष्टि/आजनविहरी, सोंड्या-२, सोंड्या-३, मांडवी-२, मोहाडी तालुक्यातील निलज खु, ढिवरवाडा, मुंढरी बु, कान्हळगांव, देव्हाडा खुर्द., टाकळी, पाचगांव क्र.-१, बोथली, मोहगावदेवी, साकोली तालुक्यातील वटेटेकर, सालेबर्डी, सासरा, खंडाळा, परसोडी (मळेघाट), परसोडी (आमराई), लाखनी तालुक्यातील पळसगाव, मिरेगाव, वाकल, विहीरगांव, नरव्हा, मऱ्हेगाव, नरव्हा-२ , लाखांदुर तालुक्यातील आसोला, लाखांदूर, अंतरगाव/खा., भागडी, खैरणा, खोलमारा, इरली डांबी, मोहरणा-२, नांदेड-२, दोनाद, रेती/वाळू उत्खननाकरीता ५४ (०.०० ते ५.०० हेक्टर) रेतीघांटास आवश्यक पर्यावरण विषयक अनुमतीकरीता जाहीर लोकसुनावणीचे दि. ३०/०१/२०२५. वेळ सकाळी ११.३० वा चे इतिवृत्त.

*******

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाच्या अधिसूचना दि. 14.09.2006 व सुधारीत अधिसूचना दि. 01.12.2009 तरतूदीनुसार जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांच्या सन २०२४ – २०२५ वर्षाकरीता भंडारा जिल्हयातील वाडेगाव (रिठी), मांडवी, कोथुर्णा, जुनी टाकळी, ता. भंडारा, पवनी तालुक्यातील भोजापूर, भोजापूर-२, खातखेडा, विलम, जुनोना-२, येनोळा-२, मांगली-१, तुमसर तालुक्यातील चारगाव, सुकळी दे, लोभी, मांडवी, वारपिंडकेपार,सोंड्या, चांदमारा, आष्टि/आजनविहरी, सोंड्या-२, सोंड्या-३, मांडवी-२, मोहाडी तालुक्यातील निलज खु, ढिवरवाडा, मुंढरी बु, कान्हळगांव, देव्हाडा खुर्द., टाकळी, पाचगांव क्र.-१, बोथली, मोहगावदेवी, साकोली तालुक्यातील वटेटेकर, सालेबर्डी, सासरा, खंडाळा, परसोडी (मळेघाट), परसोडी (आमराई), लाखनी तालुक्यातील पळसगाव, मिरेगाव, वाकल, विहीरगांव, नरव्हा, मऱ्हेगाव, नरव्हा-२ , लाखांदुर तालुक्यातील आसोला, लाखांदूर, अंतरगाव/खा., भागडी, खैरणा, खोलमारा, इरली डांबी, मोहरणा-२, नांदेड-२, दोनाद, रेती/वाळू उत्खननाकरीता ५४ (०.०० ते ५.०० हेक्टर) रेतीघांटास आवश्यक पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक ३०/०१/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता, जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा, येथे मा. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, भंडारा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते व श्री. किशोर पुसदकर, उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी समन्वयक म्हणून काम केले. सदर जनसुनावणीस श्री. जनार्दन लोंढे, अतिरिक्त जिल्हाधिकारी, भंडारा व श्री. सचिन गाढवे, जिल्हा खनिकर्म अधिकारी उपस्थित होते. अध्यक्षांच्या संमतीने सकाळी ११.३० वाजता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांची यादी सोबत जोडलेली आहे. (**सहपत्र**-1).

**पार्श्वभूमी**

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांनी भंडारा जिल्हयातील सन २०२४ – २०२५ या वर्षाकरीता प्रस्तावित ५४ (०.०० ते ५.०० हेक्टर) वाळु रेती घाटांना पर्यावरण अनुमतिसाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी मंडळास पत्र दि. ०४/१२/२०२४ अन्वये अर्ज सादर केला होता. मंडळाचे मुख्यालयाने पत्र क्रं. MPCB/JD.(WPC)/ENV-PH/B-241217-FTS-0122 date.17/12/2024. अन्वये जनसुनावणी प्रक्रिया सुरु करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते. मा. जिल्हाधिकारी भंडारा यांनी पत्र क्र. १२८/२०२५ दि. २९/०१/२०२५ अन्वये निवासी उपजिल्हाधीकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, भंडारा यांची जनसुनावणी घेण्याबाबत प्राधिकृत केले होते.

**प्रयोजन व कार्यपध्दती**

उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा तथा संयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली, व जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही, असे स्पष्ट केले. या जाहीर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच

काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप लेखी अथवा तोंडी सादर करावयाचे आहेत, त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक 14 सप्टेंबर, 2006 नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक २८/१२/२०२४ ला दैनिक द हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना तिस दिवसांच्या मुदतीसह प्रसिध्द करण्यात आली असल्याचे सांगितले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. (**सहपत्र**-2).

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. मंडळाचा आदेश क्र. ई-१०/२०२५ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-250109-FTS-0028 dtd.09/01/2025 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे. (**सहपत्र**-3). सुनावणी ईमेल व्दारे एक सुचना प्राप्त झाली आहे, प्रत सोबत जोडलेली आहे.

सदर प्रकल्पाबांबत प्रकल्प धांरकानी सादर केलेली कार्यकारी सारांश इंग्रजी आणि मराठीत सॉफ्ट कॉपीसह खालील कार्यालयात लोकांच्या माहितीसाठी आणि अभ्यासासाठी ठेवण्यात आले होते व याबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आले होते.

१. मा. जिल्हाधिकारी, भंडारा.
२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा.
३. मा. व्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र , भंडारा.
४. उप-विभागीय अधिकारी, भंडारा, जि. भंडारा.
५. उप-विभागीय अधिकारी, तुमसर, जि. भंडारा.
६. उप-विभागीय अधिकारी, साकोली, जि. भंडारा.
७. तहसिलदार, तहसिल कार्यालय भंडारा, जि. भंडारा.
८. तहसिलदार, तहसिल कार्यालय पवनी, जि. भंडारा.
९. तहसिलदार, तहसिल कार्यालय तुमसर, जि. भंडारा.
१०. तहसिलदार, तहसिल कार्यालय मोहाडी, जि. भंडारा.
११. तहसिलदार, तहसिल कार्यालय लाखांदुर, जि. भंडारा.
१२. तहसिलदार, तहसिल कार्यालय लाखनी, जि. भंडारा.
१३. तहसिलदार, तहसिल कार्यालय साकोली, जि. भंडारा.
१४. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
१५. पर्यावरण व वातावरण बदल विभाग, 15 वा माळा, नवी प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32.
१६. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, 3 रा माळा, सायन मादूंगा स्कीम रोड नं.8, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-22.
१७. क्षेत्रिय कार्यालय (पश्चिम मध्य क्षेत्र), पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भू-तल, पुर्व खंड, नवीन सचिवालय भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर-01.
१८. ग्रामपंचायत कार्यालय, भोजापूर, ता. पवनी, जि. भंडारा.
१९. ग्रामपंचायत कार्यालय, खातखेडा, ता. पवनी, जि. भंडारा.
२०. ग्रामपंचायत कार्यालय, विलम, ता. पवनी, जि. भंडारा.
२१. ग्रामपंचायत कार्यालय, मांगली , ता. पवनी, जि. भंडारा.
२२. ग्रामपंचायत कार्यालय, येनोळा, ता. पवनी, जि. भंडारा.

२३. ग्रामपंचायत कार्यालय, जुनोना , ता. पवनी, जि. भंडारा.
२४.ग्रामपंचायत कार्यालय, मांडवी, ता. तुमसर, जि. भंडारा.
२५. ग्रामपंचायत कार्यालय, सुकळी दे, ता. तुमसर, जि. भंडारा.
२६. ग्रामपंचायत कार्यालय, चारगाव, ता. तुमसर, जि. भंडारा.
२७.ग्रामपंचायत कार्यालय, लोभी, ता. तुमसर, जि. भंडारा.
२८. ग्रामपंचायत कार्यालय, सोंड्या, ता. तुमसर, जि. भंडारा.
२९. ग्रामपंचायत कार्यालय, चांदमारा, ता. तुमसर, जि. भंडारा.
३०. ग्रामपंचायत कार्यालय, आष्टी/आजनवीर, ता. तुमसर, जि. भंडारा.
३१. ग्रामपंचायत कार्यालय, वारपिंडकेपार, ता. तुमसर, जि. भंडारा.
३२. ग्रामपंचायत कार्यालय, ढिवरवाडा, ता. मोहाडी, जि. भंडारा.
३३. ग्रामपंचायत कार्यालय, मुंढरी बु, ता. मोहाडी, जि. भंडारा.
३४.ग्रामपंचायत कार्यालय, कान्हळगाव, ता. मोहाडी, जि. भंडारा.
३५. ग्रामपंचायत कार्यालय, देव्हाडा खू., ता. मोहाडी, जि. भंडारा.
३६. ग्रामपंचायत कार्यालय, निलज खु, ता. मोहाडी, जि. भंडारा.
३७. ग्रामपंचायत कार्यालय, टाकळी, ता. मोहाडी, जि. भंडारा.
३८. ग्रामपंचायत कार्यालय, पाचगाव , ता. मोहाडी, जि. भंडारा.
३९. ग्रामपंचायत कार्यालय, बोथली, ता. मोहाडी, जि. भंडारा.
४०.ग्रामपंचायत कार्यालय, मोहगाव देवी, ता. मोहाडी, जि. भंडारा.
४१. ग्रामपंचायत कार्यालय, खैरणा, ता. लाखांदूर, जि. भंडारा.
४२.ग्रामपंचायत कार्यालय, खोलमारा, ता. लाखांदूर, जि. भंडारा.
४३.ग्रामपंचायत कार्यालय, लाखांदूर, ता. लाखांदूर, जि. भंडारा.
४४. ग्रामपंचायत कार्यालय, आसोला, ता. लाखांदूर, जि. भंडारा.
४५. ग्रामपंचायत कार्यालय, भागडी, ता. लाखांदूर, जि. भंडारा.
४६.ग्रामपंचायत कार्यालय, आंतरगाव /खा., ता. लाखांदूर, जि. भंडारा.
४७. ग्रामपंचायत कार्यालय, दोनाड, ता. लाखांदूर, जि. भंडारा.
४८.ग्रामपंचायत कार्यालय, मोहरणा, ता. लाखांदूर, जि. भंडारा.
४९.ग्रामपंचायत कार्यालय, इरली डांबी, ता. लाखांदूर, जि. भंडारा.
५०. ग्रामपंचायत कार्यालय, नांदेड , ता. लाखांदूर, जि. भंडारा.
५१. ग्रामपंचायत कार्यालय, पळसगाव, ता. लाखनी, जि. भंडारा.
५२. ग्रामपंचायत कार्यालय, मिरेगाव, ता. लाखनी, जि. भंडारा.
५३. ग्रामपंचायत कार्यालय, वाकल, ता. लाखनी, जि. भंडारा.
५४. ग्रामपंचायत कार्यालय, विहीरगाव, ता. लाखनी, जि. भंडारा.
५५.ग्रामपंचायत कार्यालय, नरव्हा, ता. लाखनी, जि. भंडारा.
५६. ग्रामपंचायत कार्यालय, मऱ्हेगाव, ता. लाखनी, जि. भंडारा.
५७.ग्रामपंचायत कार्यालय, वटेटेकर, ता. साकोली, जि. भंडारा.
५८.ग्रामपंचायत कार्यालय, सालेबर्डी, ता. साकोली, जि. भंडारा.
५९. ग्रामपंचायत कार्यालय, सासरा, ता. साकोली, जि. भंडारा.
६०. ग्रामपंचायत कार्यालय, खंडाळा, ता. साकोली, जि. भंडारा.
६१. ग्रामपंचायत कार्यालय, परसोडी, ता. साकोली, जि. भंडारा.
६२. ग्रामपंचायत कार्यालय, वाडेगाव (रिठी), ता. भंडारा, जि. भंडारा.
६३. ग्रामपंचायत कार्यालय, मांडवी, ता. भंडारा, जि. भंडारा.
६४.ग्रामपंचायत कार्यालय, कोथुर्णा, ता. भंडारा, जि. भंडारा.
६५.ग्रामपंचायत कार्यालय, जुनी टाकळी, ता. भंडारा, जि. भंडारा.

तसेच कार्यकारी सारांश मंडळांचे संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेली होती.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा तथा समन्वयक यांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी भंडारा यांना सदर प्रस्तावित रेतीघांटाबाबत व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकांचे तांत्रीक सल्लागार यांनी तपशिलवार मराठी मध्ये भंडारा जिल्हयातील सन २०२४ – २०२५ या वर्षाकरीता प्रस्तावित ५४ (०.०० ते ५.०० हेक्टर) वाळु रेती घाटांना पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रस्तावित रेती घांटाची माहीती, खाणकाम पध्दत, पर्यावरण व्यवस्थापन योजना, व्यावसायीक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन, हरित पट्टा विकास योजना, प्रकल्पाचे फायदे, पर्यावरण व्यवस्थापन योजना- खर्च, इत्यादीबाबत सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, भंडारा यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, किंवा लेखी सादर करावे असे आवाहन केले.

| अ.क्र. | उपस्थितांनी उपस्थित केलेले मुद्दे/ तक्रार | प्रकल्प प्रतिनिधीने दिलेल उत्तर |
|---|---|---|
| १. | **सरपंच, आष्टी (तुमसर) :**<br>आष्टी अंजनविहिरी रेती घाटची वाहतूक पांदन रस्तावरुन केली जाते त्यामुळे शेतकऱ्यांना त्रास होतो, त्याबद्दल लेखी पत्र पण दिलेले आहे, सदर पांदन रस्त्यावरुन रेती वाहतूक करण्यात येऊ नये. | **प्रकल्प प्रतिनिधी :**<br>रेती वाहतुकीचा रस्ता गावातून जाणार नाही याची काळजी घेण्यात येईल. तुमची तक्रार आम्ही नोंदवली आहे त्यानुसार आम्ही कार्यवाही करु. |
| २. | **श्री योगेश देशमुख, पोलीस पाटील, चांदमारा (तुमसर) :**<br>• चांदमारा रेतीघाट हा सन २०१९ व २०२४ ला लिलाव झालेले आहेत पण ग्रामपंचायत चांदमारा ला पर्यावरणाच्या नावाखाली शासना कडून महसूल मिळत नाही.<br>• प्रस्तावित रेतीघाटावर मागील वर्षी कमी वृक्षारोपण केले व गावामध्ये वृक्षारोपण होणे गरजेचे आहे. | **प्रकल्प प्रतिनिधी :**<br>खनिजांवर जी रॉयल्टी भरली जाते ती जिल्हा खनिज निधी मध्ये जमा होते व जिल्हा खनिज निधी समिती समोर जे कामाचे प्रस्ताव येतात त्यावर चर्चा करुन प्राधान्य क्रमानुसार कार्यवाही करण्यात येते. वृक्षारोपणाची तरतूद आहे व त्यावर आम्ही वेळोवेळी देखरेख करु. |
| ३. | **श्री. विलास पर्वते, परसोडी (साकोली):**<br>रेती घाट वरील रस्त्याची देखभाल कोण करेल, घाट मालकाकडे किंवा शासनाकडे? | **प्रकल्प प्रतिनिधी :**<br>रेती घाट वरील रस्त्याची देखभाल, निविदाधारक करेल, ज्यात पोहोच रस्त्यावर पाणी शिंपवणे, रस्त्याची नियमित देखभाल करणे आणि वृक्षारोपण यांचा समावेश असेल. |
| ४. | **श्री. चंद्रकांत कापगते, परसोडी (साकोली):**<br>वृक्ष रोपण साठी नियोजन कश्या प्रकारे केलेले आहेत, वृक्ष रोपण कुठल्या महिन्यात व कधी होणार आहे? | **प्रकल्प प्रतिनिधी :**<br>पर्यावरण व्यवस्थापन योजना अंतर्गत वृक्षारोपन डेपो धारका करुन करण्यात येईल व त्यावर वेळोवेळी देखरेख करु. |
| ५. | **श्री. सुखदेव नवखरे, भंडारा :**<br>• काही रेती घाट आहेत जिथे रस्ता पूर्णपणे रस्ता नाही, आणि त्यासाठी डेपो धारकाला शेतातून जावे लागते. अशा परिस्थितीत शेतकरी पैसे मागतात, तर हे पैसे कोणी दयावे.<br>• वडेगांव गावात जो घाट आहे तिथे रस्त्यावर फॉरेस्ट ची नर्सरी पण आहे तर फॉरेस्ट चे लोक तिकडून जाऊ नाही देत. सध्या तिथे डेपो आहे, खूप अडचण आहे तिथे. | **प्रकल्प प्रतिनिधी :**<br>रेतीघाटावर जाण्यासाठी शक्यतोवर खाजगी रस्ते, जागा टाळण्यात येतात. चारगांव घाटांकडे जाणारा रस्ता तपासण्यात येईल तसेच वडेगाव रिठी रेतीघाट बद्दल तुम्ही दिलेल्या माहितीची आम्ही पुन्हा तपासणी करु. |

| | | |
|---|---|---|
| ६. | **श्री. दिंगबर गोपाले, आष्टी (तुमसर) :**<br>माझी शेती नदीच्या रस्त्यालगत आहे आणि तो रस्ता १०-१५ फूट पांदन रस्ता आहे त्यावरुन रेती वाहतूक करण्यात येऊ नये, आमची शेती उध्वस्त झाली आहे. याबाबत माझी विनंती आहे कि रेती धारकांनी दुसरा पहूच मार्ग काढावा. मी तुम्हाला २-३ लेखी पत्र पाठवले आहे. | **प्रकल्प प्रतिनिधी :**<br>आम्ही नोंद घेतली आहे याची तपासणी करु. |
| ७. | **सौ. प्रिती सोनवाने (उपसरपंच) आष्टी, (तुमसर):**<br>आमच्या गावाच्या हद्दीमध्ये शासकीय डेपो आहे, माझी तुम्हाला विनंती आहे कि गावाचा हद्दीमध्ये डेपो नसावा कारण आमचा अर्धा गाव त्यापाशी बसलेला आहे डेपो मुळे गावांचा लोकांना त्रास होते. | **प्रकल्प प्रतिनिधी :**<br>आम्ही नोंद घेतली आहे याची तपासणी करु. |

**मा. अध्यक्ष लोकसुनावणी समिती**

प्रस्तावित रेतीघाटांबाबत माहीती देण्यात आली आहे व त्यावर प्राप्त सर्व सुंचनांची नोंद घेण्यात आलेली आहे व वृत्तात शासनाकडे सादर करण्यात येईल.

आभार व्यक्त करुन जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

**(किशोर पुसदकर)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, भंडारा व**
**समन्वयक, लोक सुनावणी**
**समिती**

**(हेमा देशपांडे)**
**प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व**
**सदस्य, लोक सुनावणी समिती**

**(स्मिता बेलपत्रे)**
**अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, व**
**अध्यक्ष, लोक सुनावणी समिती**